# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

**दिनांक १८.०७.२०१९ रोजी (दि.१३.०६.२०१९ रोजीची तहकूब सभा, का.प.क्र.३२)**
**संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दिनांक १८ जूलै २०१९ रोजी (का.प.क्र.३२) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३० वा.वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.निपुण विनायक,भाप्रसे, नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ३. | स.स. श्रीमती सरिता अरुण बोर्डे |
| ४. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ५. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ६. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ७. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ८. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ९. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| १०. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| ११. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १२. | स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १३. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १४. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १५. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १६. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १७. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १८. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १९. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| २०. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| २१. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| २२. | स.स. श्रीमती परवीन खैसर खान |
| २३. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २४. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २५. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २६. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २७. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |

| | |
|---|---|
| २८. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| २९. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| ३०. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| ३१. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३२. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३३. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३४. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ३५. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३६. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३७. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३८. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ३९. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ४०. | स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी |
| ४१. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ४२. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ४३. | स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया |
| ४४. | स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज |
| ४५. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४६. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४७. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४८. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४९. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ५०. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ५१. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ५२. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ५३. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ५४. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ५५. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ५६. | स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र |
| ५७. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५८. | स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश |
| ५९. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ६०. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ६१. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ६२. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ६३. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |

| | |
|---|---|
| ६४. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |
| ६५. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६६. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ६७. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ६८. | स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे |
| ६९. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ७०. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ७१. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७२. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ७३. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७४. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७५. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ७६. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ७७. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ७८. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ७९. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ८०. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८१. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८२. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८३. | स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |
| ८४. | स.स. श्रीमती शोभा गुरुलिंगअप्पा बुरांडे |
| ८५. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ८६. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ८७. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ८८. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ८९. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्री.अबुल हसन अली खुर्रम अली हाशमी

श्री.त्र्यंबक तुपे :विषय पत्रिका ऐनवेळी कार्यालयात आल्यानंतर पार्कींगमध्ये व इतर ठिकाणी दिली जाते. हे योग्य नाही. घरपोच विषय पत्रिका मिळावी.

श्री.राजू शिंदे :ज्येष्ठ विचारवंत व दलित चळवळीचे व्यक्तीमत्व असलेले स्व.श्री.राजा ढाले यांचे निधन झाले त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.प्रमोद राठोड :यास अनुमोदन आहे तसेच मुंबई येथे इमारत कोसळून काही निष्पाप नागरीकांचा बळी गेला. त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

(यास स.श्री.त्र्यंबक तुपे, श्री.कैलास गायकवाड, श्री.गंगाधर ढगे, श्री.प्रमोद राठोड, श्री.राजेंद्र जंजाळ, श्री.गजानन बारवाल, श्री.विकास जैन यांचे यास अनुमोदन दिले.)

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करणेसाठी उभे रहावे.

(यावेळी स्व. राजा ढाले तसेच मुंबई येथे इमारत कोसळून मृत्यू पावलेल्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्री.राजू शिंदे :या शहराचे मा.आमदार श्री.अतुलजी सावे यांची उद्योग राज्यमंत्री पदावर निवड झाली. त्यांचे व मराठा आरक्षणासाठी मा.राज्य शासनाने मा.उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय येथे याचिका दाखल केली होती व शासनाने जे शासन निर्णय व कायदा करून जे आरक्षण मान्य केले होते. ते मा.न्यायालयाने मान्य केले व मा.सर्वोच्च न्यायालयातही त्यास होकार दिलेला आहे म्हणून राज्य शासनाचे जे जे मंत्री महोदय असेल मा.मुख्यमंत्री मा.श्री.उध्दवजी ठाकरे साहेब असतील या सर्वाचे अभिनंदन व आभार व्यक्त ठराव घ्यावा.

श्री.राजगौरव वानखेडे:स.श्री.संजयजी केनेकर यांची सुध्दा म्हाडाचे सभापती पदी निवड झाली. त्याचे अभिनंदन करावे. तसेच मराठा आरक्षणाबाबत जो निर्णय न्यायालयाने दिला. १३ टक्के आरक्षण वैध ठरविण्यात आले त्यामूळे राज्य शासनाचे व या प्रकरणाचे याचिका कर्ता श्री.विनोद पाटील यांचे अभिनंदन करावे.

श्री.प्रमोद राठोड :राज्यमंत्री महोदय श्री.अतुलजी सावे यांचे अभिनंदन करावे. तसेच मराठा आरक्षण मिळाले त्याबद्दल राज्य शासनाचे अभिनंदन करावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :मराठा आरक्षण देत असतांना कोर्टात राज्य शासनाने समाजाची बाजू भक्कमपणे लावून धरली. १३ टक्के आरक्षण मिळाले. राज्य शासनाचे अभिनंदन करावे. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयात असलेला मराठा आरक्षणाचा दावा लवकरच निकाली काढावा म्हणून श्री.विनोद पाटील यांनी केस दाखल केली होती. त्यांचेही अभिनंदन करावे. स्व.काकासाहेब शिंदे यांनी मराठा आरक्षणासाठी गोदावरीत उडी घेतली त्यामागे सर्व समाजाच्या भावना त्या सोबत जोडल्या गेल्या आहे. ज्या कारणासाठी काकासाहेब शिंदे यांनी गोदावरीत उडी घेतली होती. ते मराठा आरक्षण मा.कोर्टाने लागू केले. परंतु महापालिकेने रु.१० लक्ष आर्थीक मदत देण्याचा ठराव घेऊन सुध्दा मदत केली नाही. आजच्या आज आर्थीक मदत करावी. श्री.गजानन बारवाल यांनी जो प्रस्ताव ठेवला. अनुमोदन करतो. अभिनंदन करण्यात यावे.

श्री.विकास जैन :राज्यात मराठा आरक्षणासाठी मोठे आंदोलन करण्यात आले. राज्य शासनाने आरक्षण दिले. त्याबद्दल राज्य शासनातील सर्व मंत्री महोदय व मा.मुख्यमंत्री व मा.उध्दवजी ठाकरे साहेब यांचे अभिनंदन करावे.

श्री.विजय औताडे :जो ठराव ठेवला. त्यास अनमोदन आहे. मराठा आरक्षणाची सुरूवात या शहरातून झाली होती. भाजपा-सेना युतीच्या काळात मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम राज्य शासनाने केले त्याबद्दल मा.मुख्यमंत्री महोदय व युतीचे सर्व मंत्री महोदय व आमदाराचे अभिनंदन करावे. आरक्षणासाठी स्व.काकासाहेब शिंदे असेल मुकूंदवाडी चिकलठाणा येथील तरुण यांनी बलीदान दिले. त्यांना आर्थीक मदत देण्याचा ठराव घेतला, मदत करावी. याचिका कर्ते श्री.विनोद पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी राज्य सरकार व दिल्ली येथील मा.सर्वोच्च न्यायालयात जो पाठपुरावा केला. त्यांचेही अभिनंदन करावे.

मा.महापौर :सर्व सदस्यांनी जो अभिनंदनाचा ठराव ठेवला, त्यानुसार मा.राज्यमंत्री महोदय श्री.अतुलजी सावे यांचे अभिनंदन करण्यात येते. तसेच स.श्री.संजयजी केनेकर यांची म्हाडाच्या सभापती पदी निवड झाली. त्याचे अभिनंदन करण्यात येते. तसेच मराठा आरक्षणासाठी मा.सर्वोच्च न्यायालयात खंबीरपणे बाजू श्री.विनोद पाटील यांनी मांडली. प्रयत्न केले त्यांचेही अभिनंदन करण्यात येते व मा.कोर्टाने सुध्दा हे आरक्षण कायम ठेवण्यास होकार दिलेला आहे. तसेच राज्य शासनाने मराठा आरक्षणासाठी घेतलेला निर्णय मा.कोर्टातही सहमती दर्शविली. ठाम भुमिका राज्य सरकार युती सरकारच्या माध्यमातून झाली. शिवसेनेचे पक्ष प्रमुख श्री.उध्दवजी ठाकरे व सर्व मंत्री महोदय तसेच मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी सुध्दा सरकार म्हणुन खंबीरपणे हा आरक्षणासाठी जेथे जेथे राज्य शासनाची मान्यता लागेल ती दिली व मा.न्यायालयातही चांगली बाजू मांडली. आरक्षणासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले. त्यात श्री.विनोद पाटील असेल स.सदस्य असतील राज्य सरकारच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात येतो. मराठा आरक्षणासाठी जे स्व.काकासाहेब शिंदे यांनी बलीदान दिले त्यांना व इतर दोन लोकांना आर्थीक मदत देण्याचा ठराव मंजूर केला. त्यात काही अडचणी होत्या. मंजूर झालेली रक्कम तात्काळ द्यावी. आज संध्याकाळ पर्यंत मंजूरी घेऊन उद्या संध्याकाळपर्यंत त्यांना धनादेश देऊ.

श्री.राजेंद्र जंजाळ :ठराव घेऊन अनेक दिवस झाले तांत्रिक अडचण असेल तर मा.महापौरांशी चर्चा केली पाहिजे. नियमात व कायद्यात बसत नसेल तर विखंडीत करायला पाहिजे होता. आजपर्यंत जे ठराव घेतले. त्याची अंमलबजावणी का केली नाही? सर्वच कामे नियमाने होतात का? आम्ही विचारतो तेव्हा उत्तर मिळते हे योग्य नाही.

मा.महापौर :उद्या संध्याकाळपर्यंत धनादेश देऊ प्रशासनाला सुचना दिल्या जातील. तसेच सदस्यांना विषय पत्रिका वेळेवर द्यावी व ती घरपोच द्यावी. मोडकळीस असलेल्या इमारती बाबत मालमत्ता अधिकारी यांनी पाहणी करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :एन-९ मधील शाळेची मोडकळीस आलेली इमारतीचा काही भाग कोसळलेला आहे. फोटोसह पेपरला आले. ५० विद्यार्थी बचावले असे आले. नेमका कोणत्या इमारतीचा सर्वे केला? ही शाळा केव्हा बांधली होती? किती वर्षापर्यंत लाईफ होते? सर्व माहिती समोर यायला पाहिजे. शहरातील इतरही इमारतीचा सर्वे करावा. नसता मुंबईसारखी दुर्घटना होईल. जेथे विद्यार्थी शिक्षण घेतात त्या सर्व इमारतीचा सर्वे करावा. जेथे क्लास चालतो. त्याही इमारतीचा सर्वे करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :शाळेचे स्ट्रक्चर ऑडीट होणे आवश्यक आहे. अनेक जुन्या इमारती आहेत. एन-७ ची शाळाही अशीच आहे. सदस्य संबंधीत विभागास पत्र देतात, दुरूस्ती करण्याची मागणी करतात, कार्यवाही होत नाही. अधिकारी पाहणीसाठी येत नाहीत. गुजरातमध्ये इमारतीत घटना घडली. क्लासेसवाले यांना नोटीस दिली. त्यानंतर कार्यवाही नाही. आपले कर्मचारी जातात, चिरीमिरी घेतात, परत येतात. मुंबई सारखी घटना येथे घडू नये. याची खबरदारी घ्यावी. सर्व शाळेच्या इमारतीचे ऑडीट झाले का? दुरूस्ती झाली का? नोटीस दिली. पुढे कार्यवाही काय केली? याची माहिती घ्यावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी:वार्ड क्र.६२ मध्ये तेरणा हायस्कूल समोर मनपाची शाळा आहे. ती जागा कुणाला तरी चालविण्यासाठी दिली तेथे स्लॅब पडतो आहे. जुनी इमारत आहे. तिचेही स्ट्रक्चर ऑडीट व्हावे.

मा.महापौर :जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीना नोटीस देतो. पुढे कार्यवाही काय होते?

कक्ष प्रमुख-अतिक्रमण:मनपा कार्यक्षेत्रातील एकूण ४० इमारतीचा कलम २६४ प्रमाणे नोटीस दिलेल्या आहेत. दोन इमारती पडण्याच्या स्थितीत असल्याने दोन इमारती अतिक्रमण विभागाच्या मार्फत निष्काषीत केल्या आहेत. उर्वरीत इमारतीबाबत संचिका वार्ड अभियंता यांचेकडे पाठवून अहवाल घेऊन कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :शाळेच्या इमारतीचे यादीत नाव होते का? त्या बाबतीत काय कार्यवाही केली?

श्री.त्र्यंबक तुपे :दोन इमारती धोकादायक होत्या. बाकी नव्हत्या का? आता पाऊस आल्यानंतर उर्वरीत इमारती पडणार नाहीत का? नोटीस दिल्यानंतर जर नागरीक राहत असेल तर कायदा काय सांगतो? पर्यायी व्यवस्था काय करता येते? दोन कोणत्या इमारती निष्काषित केल्या?

अतिक्रमण प्रमुख :सिटीचौक मध्ये व दुसरी कौटीचा वाडा राजाबाजार मध्ये इमारत आहे.ती पाडली.

श्री.त्र्यंबक तुपे :३८ राहिल्या त्या पाडण्याची गरज आहे की नाही?

अतिक्रमण प्रमुख :तांत्रिक विभागाकडून अहवाल घेणार आहोत. त्यानंतर कार्यवाही करणार आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :अशा संचिका हातोहात चालविल्या पाहिजे. काही दुर्घटना होऊ शकते. एन-९ शाळा मोडकळीस आली. त्या संदर्भात दुरूस्ती करणे बाबत पत्र दिले होते. तरी कार्यवाही केली नाही. प्रत्येक वेळी ४० इमारती असल्या बाबत सांगतात. ३८ इमारती मोडकळीस असेल तर कार्यवाही का करीत नाही. तेथे जीवीतहानी होऊ नये याची दखल घ्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :घरमालक व भाडेकरू यांचे वाद असल्यामूळे कार्यवाही होत नाही. आजच्या आज बैठक घेऊन सर्व संचिका आयुक्तांनी मागवून कार्यवाही करावी. त्या इमारती पाडण्यासाठी टाळाटाळ करतो आहे. जीवीतहानी झाली. तर मनपाची बदनामी होईल. ज्या खरच मोडकळीस आहे. त्या निष्काषीत केल्या पाहिजे.

श्री.विकास एडके :४० इमारती मोडकळीस आहे. त्यांचे स्ट्रक्चर ऑडीट झाले होते.

कक्ष प्रमुख-अतिक्रमण:ऑडीट झालेले नाही.

श्री.विकास एडके :ऑडीट केले नाही तर दोनच इमारती का पाडण्यात आल्या? सर्व इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट करावे. असे न करता अधिकारी यांचे सांगण्यावरून धोकादायक आहे. असे म्हणणे योग्य नाही.

मा.महापौर :धोकादायक आहे ठरवल्या. तर स्ट्रक्चर ऑडीटची गरज आहेत का?

श्रीमती ज्योती पिंजरकर:ही शाळा इमारत धोकादायक आहे. या बाबत अनेकदा तक्रारी दिल्या. दुरूस्ती केली नाही. शिक्षणाधिकारी यांनाही सांगितले होते कार्यवाही केली नाही.

मा.महापौर :धोकादायक इमारतीचे निकष काय? स्ट्रक्चर ऑडीट करणे आवश्यक आहे की, नाही? सर्व माहिती तयार ठेवावी. सर्व शाळेच्या इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट करावे श्री.पानझडे, श्री.निकम यांनी सर्व ठिकाणी पाहणी करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :चार इमारतींना नोटीस दिल्या आहेत. स्ट्रक्चर आडीट न होता नोटीस कशा दिल्या? नियमाने अशा नोटीसा देऊ शकतो का? निकष काय आहेत? धोकादायक

इमारत आहे हे कोण ठरवते? दोन इमारती काढल्या. बाकी का काढत नाहीत? समिती आहे का? त्यात कोणते अधिकारी आहेत? कुणाचे हितसंबंध असतात? कुणाच्या सांगण्यावरून धोकादायक ठरवू शकतात का? तसे होऊ नये.

श्री.राजू शिंदे :माझे वार्डात मनपाची शाळा आहे. जिल्हा परिषदेची ती इमारत होती. त्या शाळेचे दुरूस्तीचे कामाचे टेंडर निघाले. उद्घाटन झाले. त्यानंतर लक्षात आले की, ही इमारत लोडबेरींगवर आहे. ते काम करूनही खराब होणारच होते म्हणुन बाजूलाच मनपाची शाळेची इमारत आहे. त्यावर दुसरा मजला वर याच पैशातून स्लॅब टाकण्याचा निर्णय घेतला. आज मोठी शाळा तेथे झाली. तांत्रिक विभाग काळजीने कार्यवाही संचिका मंजूर करीत नाही. जागेवर जाऊन पाहणी करायला पाहिजे. सर्वच वार्डात ड्रेनेज पाण्याचे लाईनचे काम करावेच लागते. रस्ते करणे अगोदर ड्रेनेज व पाण्याची लाईन टाकणे गरजेचे आहे. रस्ता झाल्यानंतर लगेच दोन तीन महिन्यांनी खोदला जातो. हे योग्य नाही. टेक्नीकल तपासणी करीत नाही का?

श्रीमती मिना गायके :माझे वार्डातील दुषीत पाण्याचा प्रश्न सुटत नाही. (दुषीत पाणी बॉटल सोबत घेऊन येतात.)

श्रीमती सुरेखा सानप:नारेगाव येथील शाळेचे पत्रे उडाले होते. त्यावर दगड ठेवलेले होते. जिवीतहाणी होऊ शकते. कंपाऊंड वॉलचे काम होत नाही. अर्धवट काम केले आहे. त्या ठेकेदारास ब्लॅकलिस्ट मध्ये टाकावे.

श्री.खान जहांगीर :वार्डातील शाळेचे रु.५० लक्षची कामाचे टेंडर कोणी घेत नाही? कामे होत नाहीत.

श्री.सचिन खैरे :बेगमपुरा येथील शाळेचे काम अर्धवट केले आहे काम करावे पिण्याचे पाणी द्यावे.

श्री.नासेर सिद्दीकी :अनेक वार्डात घाण पाण्याचा प्रश्न आहे. माझे वार्डातही घाण पाणी येत आहे. कार्यवाही होत नाही.

श्री.हाशमी अबुल हसन:माझा प्रश्न लेखाविभागाच्या संबंधीत आहे. दि.३१ डिसेंबर २०१८ रोजी माहिती मागितली होती दिली नाही. प्रत्येक वार्डातील घाण पाण्याचा प्रश्न आहे. ड्रेनेज लाईनच्या खाली पाणी लाईन आहे. त्यामूळे ही अडचण निर्माण होते. प्रशासन काय काम करीत आहे.ज्यांची सत्ता त्यांचे पक्षाचे सदस्यांच्या वार्डात प्रश्न आहे तर आमच्या वार्डातील प्रश्न आम्ही कुणाकडे मांडायचे.घाण पाण्यामूळे नागरीक आजारी पडू शकतात. आरोग्य धोक्यात आहे.

मा.महापौर :मोडकळीस आलेल्या इमारती बाबत माहिती द्यावी.

शहर अभियंता :इमारती पडण्याचा धोका आहे. धोकादायक इमारती बाबत संचिका मागवून घेतो. स्ट्रक्चर ऑडीट केले जाईल.

श्री.प्रमोद राठोड :धोकादायक आहे म्हणुन नोटीस देता व आता सांगता की, स्ट्रक्चरल ऑडीट करून घेतो. हे कितपत योग्य आहे? नोटीस देणे अगोदर ऑडीट करायला पाहिजे.

श्री.रेणुकादास वैद्य :ज्यांचेकडे चार्ज आहे, त्यांनी खुलासा करावा. श्री.पानझडे यांचेकडे ते काम नाही. तर खुलासा कसा करता?

श्री.प्रमोद राठोड :प्रोसेस काय आहे? त्याप्रमाणे नोटीस दिली का? नोटीस देणे अगोदर स्ट्रक्चरल ऑडीट करायला पाहिजे होते काय?

श्री.त्र्यंबक तुपे :मा.आयुक्तांनी खुलासा करावा. नियम काय आहे? शाळेच्या इमारती किती मोडकळीस आहे? सर्व माहिती प्रशासनाने दिली पाहिजे. शाळेसाठी निधी आहे. तो वाया जावू नये.

श्री.भगवान घडमोडे :नोटीस का दिल्या? प्रोसेस काय आहे? घरमालक व भाडेकरू यांचा वाद असतो त्यातून काही इमारती धोकादायक ठरविल्या का असे काही झाले का?

श्री.विकास एडके :४० इमारती किती दिवसांपासून धोकादायक आहे? यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे आवश्यक होते की नाही?

श्री.राजू शिंदे :शाळेचे अनेक कामे मा.आयुक्तांनी केले. टेक्नीकल दृष्ट्या काय करता? येईल ते मा.आयुक्तांनी करावे. स्मार्टसिटीतून शाळेचे काम करता येत असेल तर ते करावे.

श्रीमती संगिता वाघुले:नवीन शाळा उघडल्या. बालवाडी ओपन केले. तेथे सुविधा नाही.

श्री.अब्दुल मं.नाविद :माझे वार्डातील शाळा पडण्यास आलेली आहे.

श्रीमती मुल्ला सलिमा बेगम:वार्डातील शाळेचे काम अद्याप झालेले नाही.

मा.आयुक्त :मोडकळीस आलेल्या व शाळेच्या इमारती बाबत चर्चा होत आहे. शहर अभियंता याचे प्रमुख आहेत. सर्व चर्चेची नोंद घेतली. पहिल्या टप्प्यात मोडकळीस आलेल्या इमारतीची माहिती घेतली जाईल. प्रत्येक वर्षी त्याच त्या इमारती यादीत येतात का? ते बघितले जाईल. उपअभियंता कडून ४० इमारतीची यादी तपासणी केली जाईल. काही नव्याने इमारतीचा समावेश होऊ शकेल. यादी तयार केल्यानंतर ती पाडायची की नाही? त्यासाठी शास्त्रीय मापदंड असते. टेक्नीकल ऑडीट होऊन खरच पाडण्या सारख्या आहेत का? ते पहिले घ्यावे लागेल. ज्या इमारती पाडायच्या स्थितीत आहेत त्या रितसर पाडण्याची व तेथील लोक शिफ्ट करणेसाठी कार्यवाही करावी लागेल. शाळा दुरूस्तीसाठी प्रयत्न चालू आहे. खुप कामे करावी लागणार नाही. शहर अभियंता हे धोकादायक इमारती असेल त्यांचे काम करणेसाठी ६७-३ मध्ये हाती घेतले जाईल. त्याचे पेमेंन्ट तात्काळ केले जाईल. पावसामूळे शाळेची इमारत पडू शकते ती कामे तात्काळ केली जाईल.

श्री.राजू शिंदे :निविदा होऊन सुध्दा काम घेत नाही. स्मार्ट सिटीतून काही काम करता येईल का?

मा.महापौर :धोकादायक इमारती ठरविण्याचे निकष काय असतात?

मा.आयुक्त :लेखी स्वरूपात कळविले जाईल. शाळेच्या इमारतीसाठी रु.११.३० कोटी ठेवले आहे. कमी वाटत असेल तर वाढविले पाहिजे. स्मार्ट एज्युकेशनच्या नावाखाली पुर्ण आराखडा केला जाईल. जे धोकादायक आहे ते तात्काळ हाती घेऊ. जे दुरूस्तीचे काम आहे ते स्मार्टसिटी मध्ये घेण्याचा प्रस्ताव सादर करणार आहे. प्रोसेस काय आहे? त्याची लेखी माहिती दिली जाईल.

शहर अभियंता :धोकादायक इमारती बाबत शासनाचा जीआर आहे. नागरीकांची सुध्दा जबाबदारी आहे. ज्या नागरीकांची इमारत ३० वर्षापेक्षा जुनी झाली असेल त्या नागरीकांनी त्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट स्वतः खर्चाने करून घ्यायला पाहिजे. दोन वर्षापासून जाहीर निवेदनाद्वारे आपण कळवित आहोत. या वर्षीही कळवू तसेच मनपा पॅनलवर जे ९ स्ट्रक्चरल ऑडीटर आहे. ज्यांना परवानगी दिली आहे. त्या ९ लोकांची नावे दिली होती. पुन्हा एकदा नागरीकांना कळविले जाईल. ज्या घरात ते

नागरीक राहतात. त्यांची जबाबदारी आहे की, त्या घराची सुरक्षितता व ते सर्व बघण्याची त्यांची जबाबदारी आहे.

मा.महापौर :मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार श्री.सय्यद मतीन यांना सभागृहात येण्याची परवानगी देण्यात येते. (वेळ १२-५० वाजता यावेळी श्री.सय्यद मतीन सभागृहात येतात)

श्री.प्रमोद राठोड :जेव्हा नोटीस दिल्या. तेव्हा हे ९ लोक कुठे होते? ही प्रोसेस ४० इमारतींसाठी अंमलात आणली का?

श्री.रेणुकादास वैद्य :धोकादायक ज्या इमारती ठरविल्या. ती यादी किती दिवसापासून चालू आहे?

शहर अभियंता :४० इमारतीच्या संचिका मागवून घेतो.

श्री.राजेंद्र जंजाळ :पदनिर्देशित अधिकारी यांची सही असते. २६५ नुसार स्ट्रक्चरल ऑडीट करावे लागते. शहर अभियंता काय खुलासा करीत आहे?

मा.महापौर :धोकादायक इमारती कधी पासून आहेत? ते ठरविण्याचे निकष काय आहेत? कोणी ठरविले? घरमालकास भाडेकरू काढायचा असतो म्हणुन धोकादायक ठरवितो का? असे असू नये. श्री.निकम यांनी या सर्व बाबींकडे लक्ष द्यावे.

श्री.राजगौरव वानखेडे:या सर्व इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट होणे आवश्यक आहे मनपाच्या या इमारतीचे ऑडीट झाले का?

मा.महापौर :धोकादायक इमारतीचा गंभीर विषय आहे. मुंबईची घटना बघितली फार वाईट वाटते. अशा प्रकारच्या नोटीस देत असतांना त्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट व डिफीकल व्हेरीफिकेशन होणे आवश्यक आहे. तसा अहवाल बैठकीत ठेवावा. ज्या सुचना सदस्यांनी केल्या त्यांचे अवलोकन करून अहवाल तयार करावा. महापौर दालनात उद्या सर्व संचिका सह हजर रहावे.

श्री.कैलास गायकवाड:घाण पाण्याचा विषय एक दीड वर्षापासून घाण पाण्याचा प्रश्न आहे. अनेक निवेदने आली. परंतु आयुक्त पाण्याच्या प्रश्नावर गंभीर वाटत नाही.(या वेळी आयुक्त सभागृहातून निघून जातात)अनेक वेळा फोन करूनही कार्यवाही होत नाही. मी वाईट शब्द बोललो नाही. आयुक्तांनी निघून जाण्याची गरज नाही.

श्रीमती मीना गायके :नागरीक आमच्याकडे समस्या घेऊन येतात. आम्ही कुणाकडे जायचे? रविवारी माझ्या वार्डात यावे अशी विनंती आहे.

श्री.कैलास गायकवाड:कोणतीच कामे होत नाही. ठेकेदार काम करीत नाही. त्यांचे बील दिले जात नाही. आयुक्तांना मी बोलण्याचे वाईट वाटत असेल तर काम करून दाखवावे.

श्री.नासेर सिद्दीकी :कन्टेम्नेशनचे प्रॉब्लेम सॉल करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :३५ टक्के वार्डात ड्रेनेज, पाण्याचे प्रॉब्लेम आहे. विकास कामाच्या संचिका मंजूर होत नाही. दुषीत पाण्याचा प्रश्न वेळीच सोडवला पाहिजे. घाण पाणी आले तर लोक सदस्यांच्या घरी येतात. ही जबाबदारी मनपाची आहे. सदस्य बोलतात आयुक्तांना वाईट वाटणे योग्य नाही. खालचे अधिकारी काम करीत नाही आयुक्तांनी त्यांना सुचना द्याव्यात. दुषीत पाण्याचा प्रश्न ६७-३ मध्ये मंजूर करून सोडवावे.

श्रीमती अंकिता विधाते:दुषीत पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी ६७-३ मध्ये काम करावे. माझे वार्डात दुषीत पाण्याचा प्रश्न आहे. लोक वार्डात आजारी पडत आहे.

श्रीमती मनीषा मुंढे :चार वर्षापासून घाण पाण्याचा प्रश्न सूटत नाही.

श्रीमती सुरेखा सानप:माझे वार्डातील दुषीत पाण्याच्या संदर्भात प्रश्न आहे काम मंजूर आहे ठेकेदार काम करण्यास तयार नाही.

श्रीमती मुल्ला सलीमा:हमालवाडा भागात दुषीत पाणी येते प्रश्न सुटत नाही.

श्रीमती किर्ती शिंदे :तीन दिवसाआड पाणी देणार होते आता कमी दाबाने पाणी येत आहे. आठ दिवसानंतर पाणी येते.

श्री.नासेर सिद्दीकी :काही अधिकारी व्हीआरएस घेण्याच्या तयारीत आहे. ही वेळ त्यांचेवर का आली. कुणाचा दबाव आहे का? की ते काम करू इच्छित नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :काही भागात तीन दिवसाचे पाणी चार दिवसाआड केले. विचारणा केली असता, सर्व शहरात समान पाणी देणार आहोत असे म्हटले गेले. असे करून सुध्दा काही भागात आजही आठ दिवसानंतर पाणी येते. जायकवाडीतून किती पाणी येते शहराला गरज किती.गळती किती होते माहिती विचारली असता गळती बंद केली? असे उत्तर मिळाले. आम्ही बोलतो तो जनतेचे वाक्य असते. नागरीक आमच्या कडे येतात. तीन दिवसाचे पाणी चार दिवसावर केले. त्यांचा फायदा कुणाला झाला? माझे वार्डातही दोन वर्षापासून लाईन टाकली. पाणी सोडले नाही. समान पाणी देणार असेल तर त्या लाईनला पाणी सोडावे. वार्ड वाईज पाणीपुरवठ्याची वसुली काय आहे? ते सांगावे.

या वेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्रीमती स्वाती नागरे :हडको-सिडको भागात पाणी येत नाही.

श्री.सय्यद मतीन :माझे वार्डातही पाण्याचा प्रश्न आहे.

श्री.हाशमी अबुल हसन:श्री.कोल्हे यांना पाण्याच्या प्रश्ना बाबत वारंवार फोन करीत आहे. कार्यवाही करीत नाही.

श्री.नासेर सिद्दीकी :माझ्या प्रश्नाचा खुलासा करावा. अधिकारी का व्हीआरएस घेत आहे.

या वेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्रीमती सरिता बोर्डे :नगरसचिव यांना माहिती मागितली होती दिली नाही. खुलासा घ्यावा.

श्री जमीर कादरी :आमचे वार्डात पाणी वाढवून का येत नाही?

मा.महापौर :स.सदस्यांनी खाली बसून घ्यावे. श्री.हाशमी अबुल हसन यांनी खाली बसावे. एका वेळेस एकाच सदस्यांनी बोलावे.

या वेळी मा.महापौर वारंवार सदस्यांना खाली बसण्यासाठी विनंती करतात सदस्य डायस समोरच उभे राहून बोलत होते.

श्रीमती सरिता बोर्डे :सचिव यांना पत्र देऊन माहिती मागितली होती दिली नाही. दिनांक १३.०६.२०१९ च्या सभेची सीडी व ठरावाची मागणी केली दिली नाही.

श्री.नासेर सिद्दीकी :पत्र देऊन माहिती मागितली आयुक्तांनी आदेशीत केल्यानंतरही सचिव माहिती देत नाही.

मा.महापौर :स.यांनी मागितलेली माहिती सचिव यांनी त्यांना द्यावी.

श्री.कैलास गायकवाड:पाण्याच्या महत्वाच्या विषयावर चर्चा चालू आहे. जे गडबड करीत आहे. त्यांना बाहेर जाण्यास सांगावे.

या वेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर :सचिव यांनी सदस्यांनी मागितलेली माहिती द्यावी. पाण्याचा महत्वाचा विषय आहे. सदस्यांनी जागेवर बसावे. तेथूनच बोलावे.

श्रीमती सरिता बोर्डे :दुपारच्या मिटींग संपेपर्यंत मला माहिती द्यावी तरच मी खाली बसेल.

नगर सचिव :मा.महापौर यांनी आदेशीत केले. त्यानुसार सदस्यांना माहिती दिली जाईल.

श्री.हाशमी अबुल हसन:मला पाण्याचा प्रश्नावर बोलायचे आहे.

मा.महापौर :एक एक सदस्यांनी बोलावे. स.श्री.हाशमी अबुल हसन हे वारंवार सांगूनही ऐकत नाही. त्यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्द करण्यात येते. त्यांनी बाहेर जावे.

श्री.हाशमी अबुल हसन:माझे सदस्यत्व रद्द केले. परंतु लोकांना दुषीत पाणी पिण्यासाठी देणार आहात का? हा माझा प्रश्न होता. सर्व अधिकारी यांची बैठक घेऊन योग्य निर्णय करावा.

या वेळी स.श्री.हाशमी अबुल हसन हे सभागृहाच्या बाहेर जातात.

श्री.सय्यद मतीन :वार्ड २० माझे वार्डातील जे प्रॉब्लेम आहे. त्या बाबत उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांना काम करणे बाबत आदेशीत करावे. पाण्याच्या योजने बाबत आपण जे काम करीत आहात. त्याबद्दल मा.महापौर यांचे अभिनंदन करतो.

या वेळीही अनेक सदस्य मोठमोठ्याने बोलत असतात काहीही ऐकू येत नाही.

श्री.जमीर कादरी :जे निर्णय होतात. त्यांचा अंमल होत नाही. एमआयएम पक्षाचे सदस्यांना बोलू दिले जात नाही. शहरात कचरा साचला पाण्याचा प्रश्न आहे. ठेकेदार बीलासाठी बाहेर बसले आहे. कोणतीही कार्यवाही होत नाही. रु.१० लक्ष मनपाचे मी खाजगी कामासाठी खर्च केले. आरोप लावण्यात आला. त्याची सीबीआय चौकशी करावी. जर सत्य असेल तर आपण राजीनामा द्यावा किंवा मी देतो. आपण सर्वांचेच महापौर आहात विकास कामे सुध्दा झाली पाहिजे.

श्री.राजू शिंदे :शब्द मागे घेण्यास सांगावे.

मा.महापौर :सभा तहकूब करण्यात येते. (वेळ दुपारी १-५० वा.पुन्हा सभेला २-३० वाजेला सुरूवात).

श्रीमती ज्योती अभंग :माझे वार्डात कर्मचारी सोसायटी आहे तेथे पाण्याचा प्रश्न आहे तो सोडवावा. तेथील नागरीकांना पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागते. पाणी देता येत नसेल तर तसे सांगावे.

श्रीमती मुल्ला सलिमा:जुनी पाईप लाईन आहे. दुषीत पाणी येते ती बदलावी.

या वेळी नवीन सहा.संचालक हे परिचय करून देतात.

श्रीमती स्वाती नागरे :तीन दिवसाआड पाणी देणार असे पेपरला येते. परंतु वार्डात ७ वा दिवस आहे. पाणी आले नाही. ७ वाजेचे पाणी १-०० वाजता आले.

श्रीमती वैशाली जाधव:वार्डात ७-८ दिवसानंतरही पाणी येत नाही. अर्धा वार्डासाठी पाणी येत नाही. कधी तर रात्री पाणी येते.

मा.महापौर :महत्वाच्या विषयावर चर्चा चालू असतांना सदस्यांनी एकाच वेळी बोलणे योग्य नाही. एक एक सदस्यांनी बोलावे. प्रत्येक जण मला बोलू द्यावे असे मागणी करतात हे योग्य नाही. सर्वांनी शिस्त पाळावी. श्री.जमीर कादरी जे बोलले ते इतिवृत्तांत घेऊ नये.

श्री राजू शिंदे :स.सदस्या श्रीमती जाधव यांचे वार्डात नारेगाव येथील कचरा बंद केल्यानंतर कचराडेपो तेथे केला. यास सदस्यांनी सहकार्य केले. त्या वार्डात सर्व सुविधा देऊ

असे आश्वासन दिले होते. परंतु पाहिजे तेवढी कामे होत नाही. टेंडर होऊन सुध्दा काम घेत नाही. नागरीक घरी येतात. रस्त्याचे काम अर्धवट ठेवले तेथील काम करण्याचे आदेशीत करावे. त्यांचेवर कार्यवाही करावी. कचरा डेपो प्लॅन मध्ये सदस्यांनी मदत केली. सोमवार पर्यंत काम करावे. नसता, कचरा डेपोत गाड्या येऊ देणार नाही.

श्रीमती मनिषा लोखंडे:हीच परीस्थिती माझे वार्डात आहे.

मा.महापौर :मी स्वत: त्या वार्डात पाहणी करतो. सोमवारी पाहणी केली जाईल.

श्रीमती ज्योती पिंजरकर:दोन दिवसाआड पाणी येणार असे पेपरला येते. परंतु पाणी ५-६ दिवसा आड येते काही भागात ड्रेनेजचे पाणी येते. पाण्याची वेळ निश्चित नाही.

श्री.अजीम अहेमद :माझे वार्डातही ९-१० व्या दिवशी पाणी येते. अधिकारी यांना फोन केला. तर वेगवेगळी उत्तरे देतात. पाण्याची वेळ निश्चित नाही.

श्री.मनोज गांगवे :किती वार्डात दोन दिवसा आड पाणी येते? माहिती द्यावी.

या वेळी आयुक्त सभागृहात प्रवेश करतात.

श्रीमती संगिता वाघुले:वार्डात पिण्याची पाण्याची व्यवस्था नाही. विहिरीच्या कामासाठी तीन वर्षापासून बोलते काम होत नाही.

श्री शेख जफर :वार्डात घाण पाण्याची समस्या आहे. पत्र दिले कार्यवाही होत नाही. अर्धा तास घाण पाणी येते.

श्रीमती सरवत बेगम :वार्डात ८-९ व्या दिवशी पाणी येते. त्यातही घाण पाणी येते. फोन केला तर अधिकारी उचलत नाही. पाण्यास फोर्स नाही. कोणत्याही समस्या सुटत नाही पाईप टाकायचे तर ते मिळत नाही.

मा.महापौर :श्रीमती गायके, श्रीमती ज्योती नागरे, श्रीमती मुंढे, श्रीमती वाघुले यांचे वार्डातील पाण्याचा प्रश्न सोडवावा विहिरीचे काम का होत नाही? श्रीमती गायके ताई यांचे वार्डातील दुषीत पाण्याचा प्रश्न सोडवावा.

श्री.राजगौरव वानखेडे:पाण्याचा प्रश्न प्रत्येक बैठकीत येतो. अनधिकृत नळ शोध मोहिम राबविली किती नळ काढले? पुन्हा ते जोडले गेले. किती एमएलडी पाणी वाढ झाली? किती वार्डात किती दिवसानंतर पाणी दिले जाते? त्यांची माहिती द्यावी. चर्चा करून अर्थ नाही निर्णय करावा. मध्यतंरी जालना रोडच्या हॉटेलचे इलिगल कनेक्शन काढले होते. क्रांतीचौक मेनॉर हॉटेलला डायरेक्ट ४ इंचीचे मेन लाईनवरून कनेक्शन आहे. विचारणा केली असता, लिगल असल्याचे म्हटले असे असेल तर इतर नागरीकांचे लिगल कनेक्शन आहे. त्यांना दररोज पाणी का नाही? हॉटेलला सुध्दा नागरीकांप्रमाणे ४, ५, ६ दिवसाआड पाणी दिले जावे. नियोजन किती दिवसात करणार आहे?

श्रीमती कमल नरोटे :आम्ही प्रश्न मांडतो. पाणी प्रश्न सुटत नाही. ५-६ व्या दिवशी पाणी येते. दुषीत पाणी येते.

श्रीमती सुरेखा खरात:माझे वार्डातही ८-९ व्या दिवशी पाणी येते. लिकिजेस बंद केले जात नाहीत. काही घरांना पाणीच येत नाही. नागरीक घरी येऊन मागणी करतात.

श्री.अब्दुल नाईकवाडी:रस्ता कचरा व इतर प्रश्न सुटत नाही. पाण्याचा प्रश्न तर मार्गी लावावा. नागरीकांना पुरेसे पाणी द्यावे. नागरीक आमच्या घरी येतात अधिकारी फोन उचलत नाही.

श्री.बन्सी जाधव :भगतसिंगनगर भागात १ वर्षापासून पाणी येत नाही. तेथील कामाची संचिका मंजूर होत नाही. रोडचे काम होत नाही.

श्री.नासेर सिद्दीकी :८-९ व्या दिवशी पाणी येते. लेट पाणी येत असेल व त्यात वेळ जास्त जात असेल तर ३-४ दिवसाला पाणी देऊन वेळ कमी केला तरी चालेल.

श्री.त्र्यंबक तुपे :सर्व सदस्य पाण्याबाबत समस्या मांडत आहे. प्रशासनाने समस्या सोडविल्या पाहिजे. अनेक ठिकाणी ३०-४० ठिकाणी ड्रेनेजचे पाणी मिक्स होते. अनधिकृत नळ शोध मोहिम हाती घेतली ती कार्यवाही करण्याचे काम केले. परंतु ती आता चालू आहे का? नळ कट केले जाते पुन्हा पथक पुढे गेल्यानंतर नळ जोडणी होते. अशा लोकांवर गुन्हे दाखल व्हायला पाहिजे. मनपाला कार्यवाही करावी. लागते खर्च येतो. ज्यांचे अनधिकृत नळ आहे. त्यांनी स्वत:हून काढले पाहिजे. तसे पेपरला द्यावे. कमर्शियल नळ किती आहे? किती कट केले? एकाच व्यक्तीचे ३-४ नळ अनधिकृत आहे. आजही ८-९ व्या दिवशी पाणी येते. मुख्य जलवाहिनीवर जेवढा वेळ पाणी राहील तेवढा वेळ पाणी त्यांना जाते. या बाबत कार्यवाही केली पाहिजे. पाणीपुरवठ्याची जी कामे असतील ते करण्यास हरकत नाही. ड्रेनेज पाणी मिश्रीत होते ते शोधावे काम करावे. उत्पन्न वाढत नाही. काम होत नाही. सर्व गोष्टीचा विचार करावा ठेकेदार काम करण्यास तयार नाही. उत्पन्न वाढवावे. छोटी कामे असतील ती हाती घ्यावी टँकरने किती पाणी देतो? जीपीए सिस्टीम लावली काय? सर्व नियोजन करावे.

श्री.खान जहागीर :६-८ महिन्यांपासून ठेकेदार रस्त्याची काम करण्यास तयार नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :तीन दिवसाचे चार दिवसाआड केले. एक दिवसाचे पाणी कोणत्या वार्डात दिले? ही योजना राबविली त्याचा फायदा काय झाला? अजूनही पाण्याची ओरड आहे. सिडको-हडकोतही पाणी मिळत नाही. पाणी पुरवठा व दुषीत पाणी विषयी तक्रारी आहे. शहरामध्ये पाणी कमी येत असतांना दुसरे वार्डातील पाणी कमी केले. अनधिकृत नळ कनेक्शन बाबत दोन तीन दिवस कार्यवाही केली. आता बंद केली. घराची संख्या २.६० लक्ष आहे. लिगल नळ १.२५ लक्ष आहे तर बाकी इलिगल नळ आहेत का? समान पाणी देणार असेल तर माझे वार्डातील लाईनमधून पाणी का सोडत नाही?

श्री.जमीर कादरी :६-७ व्या दिवशी पाणी येत नाही. काही ठिकाणी २-३ दिवसाआड पाणी आहे. चर्चा होते निर्णय ठोस होत नाही. बायपास कनेक्शन दिले जात आहे. आमच्या वार्डात पाणी दिले जावे. पाण्याच्या सिस्टम मध्ये सुधारणा करावी. कोणत्या वार्डात किती दिवसानंतर पाणी येते? काही वार्डात एक दिवसाआड पाणी येते.

श्री.राजेंद्र जंजाळ :समान पाणी देणे बाबत काय नियोजन केले?

मा.महापौर :श्री.फालक, श्री.खाजा, श्री.पदमे यांनी सदस्यांच्या सुचना नोंद कराव्यात व तेथील प्रश्न सोडवावेत. कॉमन तक्रारी आहेत. पाणी वेळेवर न येणे कमी पाणी येते. अशा तक्रारी आहे. इलिगल नळ तोडण्याची मोहिम होती. संबंधीत अधिकारी यांनी

प्रत्यक्ष पाहणी करावी. काम करावे. पुन्हा तक्रारी येणार नाही. दखल घ्यावी. अनधिकृत नळ तोडणे बाबत कार्यवाही करावी. नळ तोडल्यानंतर पुन्हा जोडणी झ ाली असेल तर पोलीस केस करावी.

श्री.राजगौरव वानखेडे:कोणत्या वार्डात किती दिवसा आड पाणी येते? जेथे दोन दिवसाआड पाणी येत असेल तर इतर वार्डातही तसेच यावे. निर्णय होत नाही.

श्री.राजू शिंदे :मा.आयुक्त चांगले काम करतात. अधिकारी या विभागातील परेशान झाले. वय झाले कार्यक्षमता राहिली नाही. अधिकारी यांचे समन्वय नाही. त्याचा परीणाम नागरीकांना वेळेवर पाणी मिळत नाही. अधिकारी बदली करण्याच्या मन:स्थितीत आहेत. अधिकारी यांचीही अडचण असते, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या पाहिजेत. काही कामे अधिकारी यांना माहित असतांना करीत नाही. मॅनपावर वाढवावे काम करून घ्यावे. समांतर योजनेच्या माध्यमातून २४ तास पाणी देणार अशी घोषणा झाली. १२ वर्ष झाले काम केले नाही. २२ फुटापर्यंत पाणी जाणार होते. आयुक्तांनी सांगितल्यानंतर सुध्दा काम होत नाही. अशी परीस्थिती निर्माण झाली. आयुक्तांनी चांगले काम करावे. त्यांचे सोबत आम्ही आहोत. आजही वार्डात घाण पाणी येते. अनेक वार्डात एकाच व्यक्तीकडे ३-४ कनेक्शन आढळून येतात. कारण त्यांना मुबलक पाणी मिळत नाही. नवीन भरती करावी. मॅनपावर वाढवावा. कामे होईल. कायमचे प्रश्न सुटेल. तसे काम करावे. ड्रेनेजची कामे होत नाही. पाणी देतो तेही अशुध्द पाणी देतो. एसी पाईप ऐवजी डीआय पाईप टाकाव्या. सिस्टम चेक करावी. जुन्या लाईन काढाव्यात.

श्रीमती मिना गायके :नळाला दुषीत पाणी येते. समस्या केंव्हा सोडविणार आहे?

उपअभियंता :श्रीमती गायके मॅडम यांचे वार्डात व्हीजीट केली. तेथील कामाचे टेंडर ९ वेळेस काढले टेंडर घेण्यास कुणी येत नाही. दुषीत पाण्याचे काम त्वरीत करीत आहे.

मा.महापौर :ड्रेनेज लाईनचे काम आहे. दुषीत पाण्याचा प्रश्न आहे. तातडीने सोडवावा. जे ठेकेदार काम करण्यास तयार असेल त्यांचेकडून काम करावे.

श्री.आत्माराम पवार :पाण्याची लाईन ड्रेनेजच्या खाली आहे. पाण्याचा दाब वाढला. पाईपला छिद्र पडले. त्यात दुषीत पाणी जाते.

मा.महापौर :संबंधीत अभियंता यांनी ठेकेदारास बोलवून घ्यावे. उद्या पाहणी करावी. दुषीत पाण्याचा प्रश्न सोडवावा.

उपअभियंता :सिडको हडकोत ९ तारखेपासून पाणी चार दिवसाआड देत आहोत. शिवाजीनगर पुंडलिकनगर येथील टप्पा वाढून हे दिले आहे.

श्रीमती स्वाती नागरे :दिशाभूल केली जात आहे. चुकीची माहिती देत आहे. चार दिवसा आड पाणी येत नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :आमच्या वार्डात एक दिवस वाढविला ते पाणी कुठे दिले जात आहे? तेवढी यंत्रणा आपल्याकडे आहे का? टेक्नीकली सांगावे.

मा.महापौर :सदस्यांच्या लेखी तक्रारी घ्याव्यात. त्यानुसार कार्यवाही करावी.

उपअभि.-श्री.खाजा(संबंधीत अधिकारी त्यांचे कडे असलेल्या झोन निहाय त्या त्या वार्डात किती दिवसा आड पाणी दिले जाते यादी वाचून दाखवितात).

या वेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

उपअभि. श्री.फालक संबंधीत अधिकारी त्यांचे कडे असलेल्या झोननिहाय त्या त्या वार्डात किती दिवसा आड पाणी दिले जाते? याची माहिती देतात. यादी वाचून सांगतात.)

श्री.राजेंद्र जंजाळ :माझे वार्डाच्या बाजूला असलेल्या सर्वच वार्डात तीन दिवसाआड पाणी दिले जात आहे तर माझे वार्डातच चार दिवसाआड का केले?

उपअभियंता-पापू :स.श्री.आप्पासाहेब हिवाळे यांचे वार्डात लाईन नाही. त्यामूळे तेथे पाणी पुरवठा नाही. ११५ वार्डात सातारा भागात विहिरीवरून पाणी देतो.

श्री.राजगौरव वानखेडे:सिडको हडकोत किती पाणी देतो?

उपअभि.श्री.पदमे :पुंडलिकनगर भागातील रूटवर असलेले एक्सप्रेस लाईनवरील पाणी कमी केल्यामूळे सिडको हडकोत पाणी परिणाम झाला आहे. पहिले सहा दिवसाआड पाणी चालू आहे. आता चार दिवसाआड देण्याचा प्रयत्न करीत आहोत. शहागंज टाकीवरून जे पाणी देतो त्या वार्डात सहा दिवसाआड पाणी चालू आहे.

श्री.फेरोज खान :आमच्या वार्डात आठ दिवसाआड पाणी येत आहे. चुकीचे बोलू नये.

उपअभियंता-श्री.पदमे:जिन्सी टाकीवरून देण्यात येणारे पाणी त्या त्या वार्डात ५-६ दिवसा आड दिले जाते. एन-७ च्या टाकीवरून आता ४ दिवसा आड पाणी सिडको हडकोत देत आहोत.

श्री.राजगौरव वानखेडे:यापुर्वी किती दिवसाला पाणी देत होतो? अधिकारी काम करण्यास सक्षम नाही. प्रशासनाचे खालचे अधिकारी दिशाभूल करतात.

उपअभियंता श्री.पदमे :एन-७ च्या टाकीवरून सहा दिवसाआड पाणी देत होतो. इतर वार्डाची माहिती देतात. (झोन क्र.३,४ अंतर्गत वार्डात देण्यात येणारे पाणी किती दिवसा आड पाणी दिले जाते? त्याची माहिती देतात.) झोन क्र.५ चे पाणीपुरवठा चार दिवसाआड चालू आहे. यापूर्वी ५ दिवसाआड होता.

श्री.राजगौरव वानखेडे:वार्डात ७ व्या दिवशी पाणी येते. चुकीची माहिती देतात. अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी. ६० टक्के वार्डात ३ दिवसाआड तर ४० टक्के वार्डात ७-८ व्या दिवशी देतो.

श्री.नासेर सिद्दीकी :शहागंज टाकीवरून ८ दिवसाआड पाणी पुरवठा त्या त्या वार्डात होतो.

उपअभियंता-श्री.पदमे:मी मध्यतंरी सुट्टीवर होतो.

मा.महापौर :जो रेकॉर्ड आहे तो पुन्हा व्हेरीफाय करावा. स.श्रीमती वाघुले ताई यांचे वार्डातील विहिरीचे काम करावे.

उपअभियंता :विहिरीच्या कामाची निविदा ८-१० वेळेस झाली. प्रोसेसमध्ये आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :समान पाणीवाटपाच्या नावाखाली एक दिवसाचा गॅप वाढवून माझे वार्डासह काही वार्डाचा पाणीपुरवठा चार दिवसावर केला. सर्वाना समान पाणी आले पाहिजे. माझे वार्डाच्या बाजूला असलेल्या वार्डात तीन दिवसाआड पाणी दिले जाते. असे आताच सांगितले. माझेच वार्डात तीन दिवसआड का केले? माझे वार्डाचे पाणी कमी करून इतर वार्डाला पुरेसे पाणी आले का? सिडको हडकोचा पाणी प्रश्न सुटला का? अधिकारी एक दुसऱ्याचे नाव सांगून मोकळे होतात. माझे वार्डातील पाणी कुणाच्या सांगण्यावरून कमी केले? टेक्नीकल दृष्ट्या सर्व तपासून केले का? १६० लि पाणी पर व्यक्तीला दिले पाहिजे तसे झाले का? माझे वार्डातील पाणी कमी करून ते पाणी कूठे देऊन समान वाटप पाणी देतो. गॅप दिलेले पाणी

कुठे साठवून ठेवणार आहे? माझे वार्डात दोन वर्षापासून लाईन टाकली पाणी सोडले नाही.

मा.आयुक्त :पाणी प्रश्नावर व दुषीत पाणी संदर्भात चर्चा होते आहे. दुषीत पाणी येत असेल तर ते आपल्या सर्वासाठी शरमेची गोष्ट आहे.

श्रीमती ज्योती अभंग :माझे वार्डातील पाण्याचा प्रश्न सोडवावा. पाण्याचा प्रश्न सुटला नाही. तर पुढील सभेपासून डायस समोर बसेल.

श्री.राजेंद्र जंजाळ :माझे वार्डात व बाजूच्या ६ वार्डाला तीन दिवसाआड पाणी येत होते. त्यापैकी माझेच वार्डातील पाणीपुरवठा ४ दिवसाआड केला. इतर ६ वार्डात तीन दिवसा आडच पाणी येते. माझे वार्डातील पाणी कमी करून जे पाणी वाढले ते कुठे दिले गेल? टेक्नीकली उत्तर द्यावे. नेमके काय साध्य केले? टेक्नीकली कॅलक्युलेशन काय होते?

मा.महापौर :संबंधीत अधिकारी कामानिमित्त मुंबईला आहे. शहर अभियंता यांना पाणीपुरवठ्या बाबत नियोजन करणे बाबत जबाबदारी दिली.काही वार्डाचे पाणी कमी केले तर इतर वार्डात पाणी पुरवठा दिला गेला का?

शहर अभियंता :४ तारखेला आयुक्तांनी आदेश केले होते की, सिडकोची एक्सप्रेस जलवाहिनी आहे. त्यावर जे कनेक्टेड जो पुरवठा आहे तो पुरवठा समान व्हावा. नियोजन करणेबाबत आदेशीत केले होते. संबंधीत उपअभियंता पाणीपुरवठा यांचेशी चर्चा केली. त्यानुसार लक्षात आले की, एक्सप्रेस लाईन वरून जाणारे पाणी काही भागात ७,८,६,४ दिवसाआड पाणी पुरवठा होतो. शिवाजीनगर पुंडलिकनगर व एसएफएस या तीन टाकीवरील पुरवठा आहे. तो एक दिवसांनी वाढविला तर जे पाणी राहिल. ते एन-५ एन-७ च्या टाकीवर येईल व काही प्रमाणात का होईना पाणी जास्तीचे मिळेल.

श्री.राजेंद्र जंजाळ :शिवाजीनगरचा पाणी पुरवठा एक दिवसांनी लेट केल्यानंतर पाणी वाढणार असे का वाटले? या लाईनवर महापौर साहेबांच्या वार्डापासून वार्ड आहे तेथे तीन दिवसाआड पाणी येते. वॉर्ड क्र.१११,११३,९९ या बाजूच्या वार्डात तीन दिवसाआड पाणी येते फक्त शिवाजीनगरचे पाणी कमी करून सिडको हडकोसाठी पाणी वाढेल असे टेक्नीकली कसे वाटते याचा खुलासा करावा.सर्व ठिकाणचे पाणी कमी का केले नाही.

शहर अभियंता :एकट्या शिवाजीनगर वार्डाचे पाणी कमी केले नाही. एक्सप्रेस लाईनवर जे तीन पंक्चर येते त्याचे पाणी कमी केले त्यात तुमचा वार्ड येतो.

श्री.राजगौरव वानखेडे:६० टक्के शहरात तीन दिवसाआड पाणी बाकी ठिकाणी ४-६-८ दिवसाआड पाणी स.श्री.राजेंद्र जंजाळ यांचे वार्डाचे पाणी कमी करावे. असे आम्ही म्हटलेले नाही. पुर्ण शहराचे चार दिवसाआड करावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :तेच मी सांगतो की, ६० टक्के शहरात तीन दिवसाआड पाणी असतांना माझेच वार्डातील पाणीपुरवठा ४ दिवसा आड का केला?

श्री.राजगौरव वानखेडे:समांतर लाईन झाली असती तर दररोज पाणी देणेसाठी १८० एमएलडी लागणार होते. आता सध्या ११० एमएलडी पाणी येत आहे. तर एक दिवसाआड पाणी दिले

का जात नाही? समान चार दिवस सर्वच ठिकाणी पाणी द्यावे. ६० टक्के शहरात ३ दिवसाआड पाणी येते सर्वांना चार दिवसाआड करावे.

शहर अभियंता :तेवढी सिस्टीम कार्यान्वित नाही. मॅनपावर कमी आहे.

श्री.अजीम अहेमद :आमच्या ही वार्डात ४ दिवसाआड पाणी द्यावे.

मा.महापौर :इतर ही ठिकाणचे पाणी कमी केले आहे. एकाच वार्डाचे नाही. स.सदस्य श्री.जंजाळ यांची सुचना लक्षात घ्यावी. सर्वांना समान पाणी द्यावे. पाणी पुरवठ्याच्या कामासाठी निधी ठेवावा लागेल नसता ठेकेदार काम करणार नाही. जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंत जे नळ कनेक्शनधारक आहे त्याचे वेगळे अकाउंट उघडावे. पैसे जमा करून त्या त्या ठेकेदारास बिल दिले जावे. प्रशासनाने पाणीपुरवठ्याचे सुक्ष्म नियोजन करावे. कामे करणेसाठी नियोजन करावे. टेंडर का घेत नाही? त्या बाबतीत विचार करावा. स्मार्ट सिटीतून ही कामे करण्याचे कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :जर पिण्याच्या पाण्यात दुषीत पाणी येत असेल तर आपल्या सर्वासाठी फार शरमेची बाब आहे. पाणी ही बेसीक सुविधा आहे. ती मनपाने पुरविली पाहिजे. जास्तीत जास्त चांगले पाणी देण्याचा कल आपला आहे. त्यासाठी खर्च होतो परंतु मनपा क्षेत्रातील नागरीकांना पाणी पुरवल्याशिवाय दुसरा पर्याय नाही. कुठेही दुषीत पाणी आढळले तर तात्काळ कार्यवाही करावी. असे सुचना अधिकारी यांना देतो. तांत्रिक व प्रशासकीय अधिकार कार्यकारी अभियंता दिले आहे. दुषीत पाण्याचा प्रश्न असेल तर उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांनी तात्काळ उपलब्ध ठेकेदाराकडून ते काम करून घ्यावे कारण आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो. पाणीपुरवठा व ड्रेनेज विभागाचे समन्वय असला पाहिजे. शहर अभियंता हे पाणी व ड्रेनेज या दोन्हीचे प्रमुख आहे. दोन्ही विभागाने संयुक्त रित्या जाऊन काम करावे. पाणीपुरवठ्यासाठी दर महिन्याचा राखीव निधी ठेवतो जे की, देखभाल दुरूस्तीची काम चालू राहतील. पाणीपट्टीसाठी वेगळे अकाऊंट उघडणेची सुचना आली. रास्त वाटते जेणे करून तातडीचे काम करता येतील. याची लेखा विभागाने नोंद घ्यावी. पाण्याची अडचणी कशामूळे आहे? ते सांगू शकत नाही. कशामूळे व कधीपासून उदभवल्या? याची सर्व कारणे आपणास माहित आहे. या सर्व गोष्टीवर उपाय योजना हाती घ्याव्या लागेल. जायकवाडीचे किती पाणी आणायचे? सिडको हडकोसाठी विभागणी कशी करायची? व दोन्ही पाईप लाईनद्वारे कसे पाणी आणायचे? याचे नियोजन करावे लागते. ज्या अडचणी आहे त्या दोन्ही सोबत कार्यवाही केली तर अडचणी दुर करता येतील. आता नवीन योजना लवकरच मंजूर होतील. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न लवकरच सुटेल. पाण्यासाठी खर्च फिक्स नसतो. सिडको, हनुमानटेकडी अशा काही भागात शेवटच्या ठिकाणी पाणी पोहचणे अडचण आलेली आहे. या योजनेस दोन तीन वर्ष लागणार असल्याने आणखी काय करता येईल? त्यासाठी श्री.होलाणी साहेब यानी प्रेझेन्टेशन केले. रु.१४ कोटीची कामे आहे ती स्मार्ट सिटीतून मंजूर पण आहे. पीएमसी असावी. त्याचेही टेंडर काढले. जे प्रश्न मांडले ते ही यातून सुटेल. अनधिकृत कनेक्शन्स बाबत कार्यवाही सुरू केली होती. पेपरला तशी

सुचना दिली होती. ती मोहिम बंद केली नाही. दर महिन्याला ही मोहिम चालू ठेवली पाहिजे. किती अनधिकृत नळ आहे? निश्चित माहिती नाही. जे मोठे पाणी वापर करणारे लोक आहे त्यांचेवर पहिली कार्यवाही झाली पाहिजे. यासाठी सर्व विभागाचे कर्मचारी व पोलीस ठेवावे लागतात. ही मोहिम पुन्हा घेणार आहोत. रु.५०००/- दंड वसुली करण्याचा अधिकार आहे. परंतु याशिवाय नळ तोडण्यास लागलेला खर्च व जेव्हा पासून इमारत आहे नळ गैररित्या घेतला ती रक्कम वसुल केली पाहिजे. पोलीसात गुन्हा दाखल केला पाहिजे. जे चोरी करतील त्यांचे नाव पेपरला दिले पाहिजे. जे जे लोक चोरीच्या गुन्ह्यात आहे. त्यांचेवर एफआयआर दाखल केला जाईल. अनधिकृत नळ होऊ नये त्यासाठी कार्यवाही करावी लागेल. जे जबाबदार असेल त्यांच्यावर कार्यवाही केली पाहिजे. सर्व भागास सारखे पाणी मिळाले पाहिजे. हा हेतू आहे. तशी सुचना शहर अभियंता यांना केली आहे. साधारण कुठल्या भागाला कुठल्या दिवशी पाणी जाणार आहे हे जाहीर झाले पाहिजे. ज्या भागाच्या तक्रारी होत्या तेथून न येता दुसरे भागाच्या आज तक्रारी आहे. जे पाणी येते त्यातून ५०-५२ एमएलडी पाणी सिडकोसाठी जाते. बाकी सिटीमध्ये येते. सिडकोच्या लाईनवर जेवढे भाग आहे तेथे समान पाणी दिले जावे. अशा प्रकारे नियोजन चालू आहे. टेक्नीकली कसे करता येईल? ते करतो आहे. कर्मचारी संख्या कमी आहे. ११ उपअभियंता पाहिजेत, कार्यकारी अभियंता पाहिजेत. १२० लाईनमन पाहिजेत आकृतीबंध मध्ये सर्व पदे नमूद केली तो मंजूर व्हावा. पावसाचे पाणी साचविले पाहिजे. त्यांना टॅक्स मध्ये सुट दिली पाहिजे. विविध उपाययोजना करून पाण्याचा प्रश्न सोडविला जाईल.

श्रीमती नरगीस शेख :के जी एन हॉस्पीटल मध्ये कर्मचारी द्यावे. तेथे साहित्य उपलब्ध नाही.

मा.आयुक्त :तेथील कर्मचारी देणेसाठी कार्यवाही करण्यात येत आहे. जर कुणी वाजवी दरात सेवा देण्यास तयार असेल तर तसा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयासाठी येईल.

श्री.सय्यद मतीन :हर्सुल कारागृहात फॉगींग मशीन द्वारे औषधी फवारणी करावे.

मा.आयुक्त :तेथील परिस्थितीनुसार सुधारणा होणे आवश्यक आहे. जेल प्रशासनाशी चर्चा केली जाईल.

मा.महापौर :संबंधीत अधिकारी यांनी नोद घ्यावी.

**<u>विषय क्रमांक १०५८:-</u>** **(कार्यकारी अभियंता-ड्रेनेज विभाग)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दि.१९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दि.१९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीच्या आढाव्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०५९:-** **(अग्निशमन विभाग)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा देणारा विभाग आहे. अग्निशमन विभागात फायर, रेस्क्यु, पंपींग कॉल नेहमी प्राप्त होतात. सध्या अग्निशमन विभागात जुने पोर्टेबल पंप असून नेहमी खराब होत आहे. मोठ्या प्रमाणातील पाणी काढण्यासाठी ट्रेलर पंपाची आवश्यकता असून अग्निशमन विभागाकडे सदरील पंप नाहीत.

तीन कंपन्याकडून कोटेशन घेतले असता श्री.टेकॉन, हैद्राबाद यांच्याकडील सर्वात कमी दर असुन १५ ट्रेलर पंपासाठी एकुण रुपये ९३,८१,१२०/- (जी.एस.टी.करासह) व १५ पेट्रोल पोर्टेबल पंपासाठी एकुण रुपये ५,८८,०००/- असे एकुण रु.९९,६९,१२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

जी.ई.एम.पोर्टल वर ट्रेलर पंप व पोर्टेबल पंपाची किंमत जास्त असल्याचे यांत्रिकी विभागाने अभिप्राय दिलेला आहे. सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पातील अग्निशमन साहित्य खरेदी लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येणार आहे.

करीता, १५ ट्रेलर पंप व १५ पोर्टेबल पंपासाठी अंदाजपत्रक रुपये ९९,६९,१२०/- मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अग्निशमन विभागासाठी १५ ट्रेलर पंप व १५ पोर्टेबल पंप खरेदीसाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ९९,६९,१२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०६०: मंजूर (१३-६-१९ च्या सभेत घेतलेला आहे.)**

**विषय क्रमांक १०६१:-** **(आस्थापना अधिकारी-१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.२०.१०.२००८ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत प्रशासनाने विषय क्र.३१० मध्ये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील आरोग्य, यांत्रिकी विभागातील दैनिक/ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तसेच त्यामध्ये श्री.कृष्णा परभत ठोकळ, कनिष्ठ लिपीक (दैनिक वेतन) व श्री.अरुण रावजी बोडखे, वाहन चालक (दैनिक वेतन) यांची प्रकल्पग्रस्त संवर्गातून महानगरपालिकेच्या सेवेत कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबत समावेश होता.

शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.न्यायप्र-१००८/७/प्र.क्र.५८/०८/ (भाग-२)/ १६-अ.दि.१८/७/२००८ अन्वये ''प्रकल्पग्रस्तांसाठीची रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात देण्याची गरज नाही. प्रकल्पग्रस्तांच्या नेमणुका शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांनुसार संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवाराची पात्रता तपासून व जिल्हाधिकारी/पुनर्वसन अधिकारी यांनी प्रकल्पग्रस्तांच्या ठेवलेल्या ज्येष्ठता यादीनुसार काटेकोरपणे परंतु कोणत्याही स्पर्धात्मक परीक्षेशिवाय करण्यात याव्यात.'' तसेच प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना शासकीय सेवेतील गट-क व गट-ड मधील पदांवर नियुक्ती देणेबाबत निर्देश दिलेले होते.

त्यानुषंगाने दोन्ही संवर्गातील प्रकल्पग्रस्तांचा अनुशेष शिल्लक असल्याने प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव असलेल्या पदांवर श्री.कृष्णा परभत ठोकळ, कनिष्ठ लिपीक (दैनिक वेतन) व श्री.अरुण रावजी बोडखे, वाहन चालक (दैनिक वेतन) यांना कायमस्वरुपी नियुक्ती देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. ज्यात सदर पदावर बाहेरुन उमेदवार घ्यावयाचा असल्यास महानगरपालिकेच्या

आस्थापनेवर खर्चाचा अतिरिक्त भार पडेल व सदर कर्मचारी पुन्हा महानगरपालिकेच्या आस्थापनेवर दैनिक वेतनावर राहील, असे नमूद करण्यात आले होते. तथापि, दि.२०.११.२००८ रोजी (दि.२०.१०.२००८ रोजीची तहकूब सभा) झालेल्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणताही निर्णय झाला नाही.

त्यामुळे दैनिक वेतनावरील कार्यरत कनिष्ठ लिपीक श्री.कृष्णा परभत ठोकळ यांनी 'कनिष्ठ लिपीक' या पदावर कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबत मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.१०९३२/१६ दाखल केली होती. सदर याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.०९.०८.२०१७ रोजी सुनावणीअंती निर्णय दिला आहे की, याचिकाकर्ता श्री.कृष्णा परभत ठोकळ यांना 'कनिष्ठ लिपीक' या पदावर कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबत मा.सर्वसाधारण सभेने निकालाच्या दिनांकापासून ०६ महिन्यात निर्णय घेवून तसे संबंधितास कळविण्याबाबत निर्देश दिले आहे.

श्री.कृष्णा परभत ठोकळ यांची प्रथम नियुक्ती ही दैनिक वेतनावर 'कनिष्ठ लिपीक' म्हणून दि.२०.०६.१९९५ रोजी झाली आहे. त्यांची नियुक्ती ही प्रकल्पग्रस्त म्हणून झालेली नाही. तसेच त्यांची नियुक्ती ही विहित पध्दतीचा अवलंब न करता झालेली आहे. तसेच जिल्हा प्रकल्पग्रस्तांचे प्रतिक्षा यादीमध्ये संबंधिताचे नांवे आहे किंवा नाही, याबाबतची तपासणी होणे आवश्यक आहे.

दि.२७.१०.२००९ रोजीच्या सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णयानुसार ''मा.उच्च न्यायालय औरंगाबाद पूर्ण खंडपीठाने (Larger Bench) दिलेल्या दि.०९.०७.२००९ रोजीच्या निर्णयानुसार 'प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्या जाहिरातीशिवाय व त्यांची सेवाप्रवेश अर्हता व गुणवत्ता डावलून करता येणार नाही'असे निर्देश आहेत. तसेच महापालिका आस्थापनेवरील दैनिक/ठराविक वेतनावर कार्यरत कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबतचे प्रकरण शासनाकडे कार्यवाही अंतर्गत आहे.

करिता मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०९.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार श्री कृष्णा परभत ठोकळ,दैनिक वेतन कनिष्ठ लिपिक यांना 'कनिष्ठ लिपीक' या पदावर कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबत प्रस्ताव क्र.३१०. दि.२०.१०.२००८ मध्ये सहा महिन्याच्या आत निर्णय होणे आवश्यक असल्याने उपरोक्त बाबींचा साकल्याने विचार करण्याबाबतचा सदर प्रस्ताव विचारार्थ मा.सर्वसाधारण सभा दि.०९.०२.२०१८ रोजी का.प.क्र.०४ मधील विषय क्र.१९९ नुसार सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर मा.सर्वसाधारण सभेने खालीलप्रमाणे ठराव पारीत केलेला आहे.

''धरणग्रस्तांच्या संदर्भात सन २००८ साली अस्तित्वात असलेले शासन निर्णय व सद्यस्थितीत असलेले शासन निर्णय वेगळे असल्याचे प्रशासनाने प्रस्तावात म्हटले आहे. त्यामुळे सदरील प्रकरणात प्रशासनाने महाराष्ट्र राज्य शासनाच्या नगर विकास विभाग खात्यामार्फत शासनाने विधी विभागाचे मार्गदर्शन व अहवाल मागविण्यात यावा शासनाचा अहवाल आणि मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर शासन निर्णय,शासन परिपत्रक महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या प्रचलित पध्दतीने होणाऱ्या नियुक्ती बाबतची सर्व कार्यवाही करण्यासंबंधी नियमातील तरतुदी, कायदेशीर बाबी तपासून या प्रकरणी योग्य ती कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.''

सद्यस्थितीत मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचे अनुषंगाने प्रकरणांत मा.उच्च न्यायालयाचे विधीज्ञांचे कायदेशीर मत घेण्यात आले असता, सदरील प्रकरणी प्राप्त अभिप्रायानुसार प्रकल्पग्रस्तांची निवड जाहिरात देऊन, गुणवत्ता आणि स्पर्धात्मक पध्दतीने भरावी जेणेकरुन समानतेचे निकष पाळले जातील हा निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिलेला आहे. तथापि, या निर्णयापुर्वीच श्री.ठोकळ यांची निवड, निवड समितीने तत्कालीन प्रचलित नियमानुसार केली होती. तथापि मा.न्यायालयाचा निर्णय प्राप्त परिस्थितीत पुर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही, असे मत प्राप्त आहे. करिता श्री.कृष्णा ठोकळ,

कनिष्ठ लिपीक (दैनिक वेतन) यांना प्रकल्पग्रस्त आरक्षणातून महानगरपालिका आस्थापनेवर कायमस्वरुपी नियुक्ती देण्यात यावी, असे मत नोंदविले आहे.

करिता विधीज्ञांनी दिलेल्या कायदेशीर मताचे अनुषंगाने प्रस्ताव फेरविचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.भगवान घडमोडे:सदरील प्रकरणात मा.न्यायालयाचे निर्देश/सुचना आहे. अनेक दिवसांपासूनचे हे प्रकरण आहे. प्रस्ताव मंजुर करावा. संबंधीतास नियुक्ती द्यावी.

मा.नितीन साळवी :मा.महापौर साहेब सन २००८ मध्ये श्री.कृष्णा ठोकळ यांना कनिष्ठ लिपीक संवर्गात प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव पदावर महानगरपालिका आस्थापनेवर कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबत निवड समितीमार्फत सर्वानुमते शिफारस केली होती. निवड समितीच्या शिफारशीच्या तारखेपासुन त्यांना सेवेत कायम करण्यास मंजुरी द्यावी.

मा.महापौर :श्री.कृष्णा परभत ठोकळ यांना कनिष्ठ लिपीक संवर्गात प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव पदावर महानगरपालिका आस्थापनेवर कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबत निवड समितीमार्फत सर्वानुमते शिफारस केली होती. सभागृहाच्या भावना विचारात घेऊन स.सदस्य श्री.नितीन साळवी यांनी या प्रस्तावासंबंधी जे मत मांडलेले आहे त्यानुसार निवड समितीच्या शिफारशीच्या अधिन राहून त्यांना सेवेत कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.कृष्णा परभत ठोकळ, कनिष्ठ लिपीक (दैनिक वेतन) यांना प्रकल्पग्रस्त आरक्षणातून महानगरपालिका आस्थापनेवर कायमस्वरुपी नियुक्ती देण्याच्या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे विधीज्ञांचे प्राप्त अभिप्रायानुसार त्यांची निवड, निवड समितीने तत्कालीन प्रचलित नियमानुसार केली होती, विधीज्ञांनी दिलेल्या कायदेशीर मताचे अनुषंगाने निवड समितीने शिफारस केलेल्या अहवालाप्रमाणे श्री.कृष्णा परभत ठोकळ, कनिष्ठ लिपीक (दैनिक वेतन) यांना त्यांना प्रकल्पग्रस्त आरक्षणातून महानगरपालिका आस्थापनेवर कनिष्ठ लिपीक या पदावर कायमस्वरुपी नियुक्ती देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०६२:-** **(आस्थापना अधिकारी-१)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री.अय्युबखान नुरखान पठाण, स्थानिक संस्था कर अधिकारी यांचेकडे उपआयुक्त(म.) या पदाचा अतिरिक्त कार्यभार असताना दैनिक वेतनावरील लिपीक पदावरुन कायमस्वरुपी नियुक्तीबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या येणाऱ्या सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यासाठी १,००,०००/- रुपये लाच स्विकारण्याचे मान्य करुन लाचेची रक्कम पंच साक्षीदारासमक्ष अन्य कर्मचाऱ्यामार्फत स्विकारताना दिनांक २६/१०/२०१७ रोजी अटक करण्यात आली. पोलीस ठाणे सिटीचौक येथे गु.र.नं.३७४/२०१७ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७,१२,१३(१)(ड)सह १३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. यावरुन संबंधितांना निलंबित करण्यात आले. मा.विशेष न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाले असून खटला क्र.२४ दि.०४/०८/२०१८ असा आहे. त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी करण्यासाठी दोषारोपपत्र बजाविण्यात आले आहे. ते दिनांक ३१/०१/२०१९ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) आणि ५६(५) (स्पष्टीकरण) प्रमाणे महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त (वेतनश्रेणी पे बँड रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु.४,४००/-) या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे अशा अधिकाऱ्याची नियुक्ती प्राधिकारी व शिस्तभंगविषयक प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे. संबंधितांची वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४,६००/- अशी आहे.

करीता, श्री.अय्युबखान नुरखान पठाण (सेवानिवृत्त) यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेच्या मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर.

मा.महापौर :विषय क्रमांक-१०६२ व विषय क्रमांक-१०६३ संदर्भात पत्र देऊन डिटेल माहिती देण्याबाबत सुचविले होते. पुढील सभेत हे दोन्ही प्रस्ताव सविस्तर माहितीसह सादर करावे. चौकशीचा अहवालही मागविला आहे. तो ही द्यावा.

**ठराव:-**

प्रस्तूत प्रस्तावासंदर्भात पत्र देऊन डिटेल माहिती देण्याबाबत सुचविले होते. पुढील सभेत हा प्रस्ताव सविस्तर माहिती व चौकशीचा अहवालासह सादर करावा.

**विषय क्रमांक १०६३:-** **(आस्थापना अधिकारी-१)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री.एन.जी.दुर्रानी (सेवानिवृत्त) हे लेखाधिकारी म्हणून कार्यरत होते. ते दिनांक ३१/१२/२०१७ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेले आहेत. मुख्य लेखाधिकारी रजेवर असल्याने श्री.दुर्रानी यांचेकडे दि.१/११/२०१७ ते ३१/१२/२०१७ या कालावधीत मुख्य लेखाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला होता. परंतु संबंधितांनी या कालावधीत कंत्राटदारांची एकूण रु.३२ कोटीची देयके ज्येष्ठता न बघता अदा केल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यावरुन याबाबत चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिनांक २७/०४/२०१८ रोजी दिलेल्या अहवालानुसार खालील अनियमितता दिसून आल्या.

१) प्रकरणात तत्कालीन मुख्य लेखाधिकारी श्री.नजीर दुर्रानी, यांनी सेवानिवृत्तीपुर्वी माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ या दोन महिन्याच्या कालावधीत प्रतिमाह अनुक्रमे ४९ व २३ प्रकरणांत बांधील खर्चाची रु.१२,८१,५९,९६१/- देणी अदा केलेली आहेत. तथापि दोन महिन्याच्या कालावधीत बांधील खर्चापैकी एकूण रु.७,२९,५०,१७६/- ची देणी अदा केल्याचे दिसून येत नाही.

२) लेखा विभागात उक्त दोन महिन्याचे कालावधीत २२५ ठेकेदारांचे एकूण रु.२७,११,५०,९६४/- चे देयके अदा करताना क्रमवारीनुसार यादी तयार करुन देयके अदा केल्याचे निदर्शनास आले नाही.

संबंधितांनी केलेल्या वरील अनियमिततेबाबत त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी करण्यासाठी दोषारोपपत्र बजाविण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) आणि ५६(५) (स्पष्टीकरण) प्रमाणे महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त (वेतनश्रेणी पे बँड रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु.४,४००/-) या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे अशा अधिकाऱ्याची नियुक्ती प्राधिकारी व शिस्तभंगविषयक प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा असून संबंधितांची वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४,४००/- अशी आहे.

करीता, श्री.एन.जी.दुर्रानी, लेखाधिकारी (सेवानिवृत्त) यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेच्या मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर.

मा.महापौर :विषय क्रमांक-१०६२ व विषय क्रमांक-१०६३ संदर्भात पत्र देऊन डिटेल माहिती देण्याबाबत सुचविले होते. पुढील सभेत हे दोन्ही प्रस्ताव सविस्तर माहितीसह सादर करावे. चौकशीचा अहवालही मागविला आहे. तो ही द्यावा.

**ठराव:-**

प्रस्तूत प्रस्तावासंदर्भात पत्र देऊन डिटेल माहिती देण्याबाबत सुचविले होते. पुढील सभेत हा प्रस्ताव सविस्तर माहिती व चौकशीचा अहवालासह सादर करावा.

**विषय क्रमांक १०६४ : (१३-६-२०१९ रोजी मंजूर केला).**

**विषय क्रमांक १०६५:-** **(भांडार विभाग)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत चतुर्थश्रेणी स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांना गणवेश विनियम २००१ व महासभेचा ठराव क्र.३९०/२ दिनांक १९.०५.२००१ नुसार प्रतिवर्षी स्त्री कर्मचाऱ्यांना ०२ गणवेश साड्या व पुरुष कर्मचाऱ्यांना ०२ गणवेशाचे कापड दिले जाते. त्यानुसार प्रतिवर्षी स्त्री कर्मचाऱ्यांना गोल्डन ब्राऊन रंगाची साडी नेव्ही ब्ल्यु रंगाची किनार असलेली साडी देण्यात येते. तथापी, स्त्री कर्मचाऱ्यांनी लाल रंगाऐवजी आकाशी रंगाची (Sky Blue) रंगाची साड्या देण्याबाबत विनंती केली आहे.

सन २००९-२०१० या वर्षात कामगार शक्ती संघटना व स्त्री मजुर यांनी विनंती केल्यानुसार निळ्या रंगाऐवजी गोल्डन ब्राऊन रंगाची नेव्ही ब्ल्यु रंगाची किनार असलेली साडी देण्यास मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.८९८ दि.२५.०१.२०१० नुसार मंजुरी देण्यात आली आहे.

परंतू मा.महापौर यांनी त्यांचे पत्र क्र.५५७ दि.१६.०३.२०१८ नुसार चतुर्थश्रेणी स्त्री कर्मचाऱ्यांनी त्यांना देण्यात येणाऱ्या साड्याचा लाल रंगाऐवजी निळी (Sky Blue) रंगाच्या साड्या देणेबाबत सुचित केले आहे. त्यानुसार काही झोन कार्यालयाकडील स्त्री कर्मचाऱ्यांना बोलावून निळी (Sky Blue)रंगाच्या साड्या देण्यात याव्यात म्हणून साडी पसंत करून त्यावर स्वाक्षरी केले असून त्यास संमती दिली आहे.

करीता, कर्मचाऱ्यांची मागणी लक्षात घेवून आगामी खरेदीच्या वेळी गोल्डन ब्राऊन ऐवजी निळी (Sky Blue) रंगाची साडी दरवर्षी स्त्री सफाई कर्मचाऱ्यांना खरेदीद्वारे देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत चतुर्थश्रेणी स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांना गणवेश विनियम २००१ व महासभेचा ठराव क्र.३९०/२ दिनांक १९.०५.२००१ नुसार प्रतिवर्षी स्त्री कर्मचाऱ्यांना ०२ गणवेश साड्या व पुरुष कर्मचाऱ्यांना ०२ गणवेशाचे कापड दिले जाते. त्यानुसार प्रतिवर्षी स्त्री कर्मचाऱ्यांना गोल्डन ब्राऊन रंगाची साडी नेव्ही ब्ल्यु रंगाची किनार असलेली साडी देण्यात येते. त्याऐवजी स्त्री कर्मचाऱ्यांना लाल रंगाऐवजी आकाशी रंगाची (Sky Blue) रंगाची साड्या देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०६६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, योगेश भानुदास भाग्यवंत हा विद्यार्थी एन-६, मथुरानगर, हडको, औरंगाबाद येथील रहिवासी आहे. हा विद्यार्थी आंतरराष्ट्रीय स्तरावर योगा व मल्लखांब स्पर्धेस

खेळत असून भारतीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेला आहे. या स्पर्धेत सहभागी होऊन त्यास आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खेळण्यासाठी संधी मिळाली आहे. त्यामुळे आपल्या शहराचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकेल. त्यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने तो थायलंड येथे प्रवासास स्वखर्चाने जाऊ शकत नाही.

करीता, संबंधीतास आंतरराष्ट्रीय स्पर्धेस सहभागासाठी प्रवास व निवास व्यवस्थेसाठी र.रु.०२ लक्षची मनपातर्फे आर्थिक मदत देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी

**अनुमोदक:-**श्रीमती मिना रामदास गायके, श्री.सिताराम इसराम सुरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, योगेश भानुदास भाग्यवंत, एन-६, मथुरानगर, हडको, औरंगाबाद हा विद्यार्थी आंतरराष्ट्रीय स्तरावर योगा व मल्लखांब स्पर्धेस खेळत असून त्यास आंतरराष्ट्रीय स्पर्धेस सहभागासाठी प्रवास व निवास व्यवस्थेसाठी मनपातर्फे र.रु.०२ लक्षची आर्थिक मदत देण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १०६७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.सोहेल मोहियोद्दीन इकबाल मोहियोद्दीन हे महानगरपालिका ऊर्दु प्राथमिक शाळा क्र.१५, मिरज, जि.सांगली येथे सहाय्यक शिक्षक (उपशिक्षक) या पदावर कार्यरत आहे. सदर शिक्षक औरंगाबाद शहराचा रहिवाशी असून स्वत: ६४% अपंग आहे आणि संबंधीताची आई वयोवृध्द असून नेहमी आजारी राहते. संबंधीत शिक्षकाला स्वत: अपंगत्व असून त्याला आपल्या आईची देखभाल व सेवेसाठी माझी कुटूंबात राहणे गरजेचे आहे. नोकरी सांगली जिल्ह्यात असल्याने संबंधीतास सांगली ते औरंगाबाद जाणे-येणे करावे लागत आहे. संबंधीत शिक्षकाने आंतरजिल्हा बदलीसाठी शिक्षणाधिकारी, औरंगाबाद महानगरपालिका यांना अर्ज दिलेला आहे आणि तसेच सदर अर्ज प्रशासन अधिकारी, सांगली-मिरज कुपवाडा शहर महानगरपालिका शिक्षण विभाग, सांगली यांनाही एकतर्फी जिल्हा बदलीसाठी अर्ज केला आहे.

तरी, संबंधीत शिक्षक श्री.सोहेल मोहियोद्दीन इकबाल मोहियोद्दीन हे ६४% अपंग असल्याने त्यांना औरंगाबाद महानगरपालिका येथे जिल्हा बदलीबाबत ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.खान इरशाद इब्राहीम

**अनुमोदक:-**श्रीमती नसीमबी सांडू खान, श्रीमती शेख नरगीस सलीम

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सोहेल मोहियोद्दीन इकबाल मोहियोद्दीन, सहाय्यक शिक्षक (उपशिक्षक), महानगरपालिका ऊर्दु प्राथमिक शाळा क्र.१५, मिरज, जि.सांगली येथे कार्यरत असून ते ६४% अपंग असल्याने त्यांना एकतर्फी जिल्हा बदली अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिका येथे ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०६८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात उद्योग व्यापारी, प्रतिष्ठित व्यक्ती त्यांच्या परिसरातील विकास कामासाठी जसे कचरा उचलने, साफसफाई करणे, सुशोभीकरण करणे इ. कामे करण्यासाठी तयार आहेत व त्याकामासाठी येणाऱ्या खर्चाच्या १० ते १५ टक्के रक्कम खर्च करण्यास तयार असून मनपाने त्यासाठी प्रथम प्राधान्य देऊन ते काम केले पाहिजे. त्यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडेल.

करीता, उर्वरीत रक्कम मनपातर्फे खर्च करून विकासात्मक कामे करून घ्यावेत यासाठी सदरील प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-** श्री.गोकूळसिंग संपतसिंग मलके

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात उद्योग व्यापारी, प्रतिष्ठित व्यक्ती त्यांच्या परिसरातील विकास कामासाठी जसे कचरा उचलणे, साफसफाई करणे, सुशोभीकरण करणे इ. कामे करण्यासाठी तयार आहेत व त्याकामासाठी येणाऱ्या खर्चाच्या १० ते १५ टक्के रक्कम खर्च करण्यास तयार असून मनपाने त्यासाठी उर्वरीत रक्कम खर्च करून विकासात्मक कामे करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०६९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील प्रभाग क्र.७२, क्रांतीचौक येथील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्रमांक | अ.क्र. | जुने कामाचे नाव | नविन कामासाठी लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| Zone-09-Spill-P.No.287 | ४९ | प्रभाग क्र.७२, क्रांतीचौक अंतर्गत गोपाल टी चौक ते उत्सव मंगल कार्यालय पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे. रु.४९,६८,०००/- | वॉर्ड क्र.७२ अंतर्गत राष्ट्रवादी भवन ते यशोमंगल कार्यालय पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे. रु.४९,६८,०००/- |

**सुचक:-**श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर **अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७२, क्रांतीचौक येथे खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक | अ.क्र. | जुने कामाचे नाव | नविन कामासाठी लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| Zone-09-Spill-P.No.287 | ४९ | प्रभाग क्र.७२, क्रांतीचौक अंतर्गत गोपाल टी चौक ते उत्सव मंगल कार्यालय पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे. रु.४९,६८,०००/- | वॉर्ड क्र.७२ अंतर्गत राष्ट्रवादी भवन ते यशोमंगल कार्यालय पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे. रु.४९,६८,०००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०७०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८३, मुकूंदवाडी या वॉर्डातर्गत येणाऱ्या वसाहती मध्ये मुलभूत सोई-सुविधा पुरविणे या लेखाशिर्षांतर्गत महाराष्ट्र शासनाकडून निधी प्राप्त होणेसाठी प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या मंजुरीसाठी पाठविणेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | अ.प.रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत मनपाच्या मोकळ्या ग्राऊंडमध्ये जॉगींग ट्रॅकसाठी पेव्हर ब्लॉक बसविणे. | ५०.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत देवगिरी कॉलनी येथे विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ६०.०० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत न्यु देवगिरी कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे | ४०.०० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत ए-१ हॉटेल ते हनुमान मंदिर पर्यंत पाथवे बनविण्यासाठी पेव्हर ब्लॉक बसविणे. | ३५.०० लक्ष |
| ५. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत शिवाजी कॉलनी येथे विविध ठिकाणी सिमेंट रस्ता व पेव्हर ब्लॉक बसविणे. | ७०.०० लक्ष |
| ६. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत लघुवेतन हौ.सो.मध्ये नवीन ड्रेनेज लाईन टाकणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. | ४०.०० लक्ष |
| ७. | वॉर्ड क्र.८३, जुन्या मुकूंदवाडी गावात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ५०.०० लक्ष |
| ८. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत विविध भागात नविन पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे. | ६०.०० लक्ष |
| ९. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत पुरी महाराज यांचे गल्लीत ड्रेनेज लाईन टाकणे व सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ५०.०० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती कमल रामचंद्र नरोटे **अनुमोदक:-**श्रीमती स्वाती किशोर नागरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, प्रभाग क्र.८३, मुकूंदवाडी या वॉर्डातर्गत येणाऱ्या वसाहती मध्ये मुलभूत सोई-सुविधा पुरविणे या लेखाशिर्षांतर्गत महाराष्ट्र शासनाकडून निधी प्राप्त होणेसाठी प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या मंजुरीसाठी पाठविणेस मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | अ.प.रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत मनपाच्या मोकळ्या ग्राऊंडमध्ये जॉगींग ट्रॅकसाठी पेव्हर ब्लॉक बसविणे. | ५०.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत देवगिरी कॉलनी येथे विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ६०.०० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत न्यु देवगिरी कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | ४०.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ४. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत ए-१ हॉटेल ते हनुमान मंदिर पर्यंत पाथवे बनविण्यासाठी पेव्हर ब्लॉक बसविणे. | ३५.०० लक्ष |
| ५. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत शिवाजी कॉलनी येथे विविध ठिकाणी सिमेंट रस्ता व पेव्हर ब्लॉक बसविणे. | ७०.०० लक्ष |
| ६. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत लघुवेतन हौ.सो.मध्ये नवीन ड्रेनेज लाईन टाकणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. | ४०.०० लक्ष |
| ७. | वॉर्ड क्र.८३, जुन्या मुकूंदवाडी गावात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व सिमेंट काँक्रीट रस्ता तयार करणे. | ५०.०० लक्ष |
| ८. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत विविध भागात नविन पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे. | ६०.०० लक्ष |
| ९. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत पुरी महाराज यांचे गल्लीत ड्रेनेज लाईन टाकणे व सिमेंट काँक्रीट रस्ता तयार करणे. | ५०.०० लक्ष |

**<u>विषय क्रमांक १०७१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७१ येथे नागरीकांच्या मागणीनुसार व त्यांच्या सोयी करीता खालील नमुद तक्त्यामधील लेखाशिर्षक तसेच स्थळ बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| **सन २०१८-२०१९ मधील मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली कामे** | **रक्कम रु.** **(हजारात)** | **च्या ऐवजी** | **रक्कम रु.** **(हजारात)** |
|---|---|---|---|
| **लेखाशिर्षक:**विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण<br>३. वॉर्ड क्र.७१, उस्मानपुरा, क्रांतीनगर येथील खुल्या जागेत सामाजिक सभागृह बांधणे. Zone-09-Spill P.No-302 | ५००० | **लेखाशिर्षक:नविन काँक्रीट रस्ते (शहरी भाग)** वॉर्ड क्र.७१, उस्मानपुरा मधील श्री.अखिलभाई, श्री.लईक भाई व श्री.परवेज भाई यांच्या घराजवळील रस्त्यांचे काँक्रीटींग करणे. | २५०० |
| | | वॉर्ड क्र.७१ मधील मुख्य उस्मानपुरा भागातील श्री.अब्दुल भाई व श्री.अजीज भाई यांच्या घरासमोरील रस्त्यांचे व्हाईट टॉपिंग करणे. | २५०० |
| **लेखाशिर्षक:**नविन काँक्रीट रस्ते (शहरी भाग)<br>१५. वॉर्ड क्र.७१, क्रांतीनगर अंतर्गत विविध ठिकाणी काँक्रीटींग करणे. GBR-zone-09-Spill P.No-95 | २५०० | **लेखाशिर्षक:नविन काँक्रीट रस्ते (शहरी भाग)** वॉर्ड क्र.७१, उस्मानपुरा मधील श्री.रज्जाक भाई यांच्या घरापासून ते ललितकला भवन पर्यंतच्या रस्त्यांचे काँक्रीटींग करणे. | २५०० |

करीता, वरील नमुद प्रमाणे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सरिता अरुण बोर्डे **अनुमोदक:-**श्री.कादरी जमीर अहेमद रहिम अहेमद

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७१ येथे खालील नमुद तक्त्यामधील लेखाशिर्षक तसेच स्थळ बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| सन २०१८-२०१९ मधील मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली कामे | रक्कम रु. (हजारात) | च्या ऐवजी | रक्कम रु. (हजारात) |
|---|---|---|---|
| **लेखाशिर्षक:**विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण<br>३. वॉर्ड क्र.७१, उस्मानपुरा, क्रांतीनगर येथील खुल्या जागेत सामाजिक सभागृह बांधणे. Zone-09-Spill P.No-302 | ५००० | **लेखाशिर्षक:नविन कॉंक्रीट रस्ते (शहरी भाग)** वॉर्ड क्र.७१, उस्मानपुरा मधील श्री.अखिलभाई, श्री.लईक भाई व श्री.परवेज भाई यांच्या घराजवळील रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे. | २५०० |
| | | वॉर्ड क्र.७१ मधील मुख्य उस्मानपुरा भागातील श्री.अब्दुल भाई व श्री.अजीज भाई यांच्या घरासमोरील रस्त्यांचे व्हाईट टॉपिंग करणे. | २५०० |
| **लेखाशिर्षक:**नविन कॉंक्रीट रस्ते (शहरी भाग)<br>१५. वॉर्ड क्र.७१, क्रांतीनगर अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटींग करणे. GBR-zone-09-Spill P.No-95 | २५०० | **लेखाशिर्षक:नविन कॉंक्रीट रस्ते (शहरी भाग)** वॉर्ड क्र.७१, उस्मानपुरा मधील श्री.रज्जाक भाई यांच्या घरापासून ते ललितकला भवन पर्यंतच्या रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे. | २५०० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०७२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२९ मधील ट्रॅफिक गार्डन याचे नाव बदलुन "भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी" असे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शोभा नारायण वळसे **अनुमोदक:-**श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२९ मधील ट्रॅफिक गार्डन यांचे नाव बदलुन "भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०७३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेत शिक्षण विभागात बरेच सहाय्यक शिक्षकाच्या जागा रिक्त आहेत. तरी श्रीमती फरीदा जबीन अ.गफ्फार ही भिवंडी, निजामपुर शहर महानगरपालिकेत सहाय्यक शिक्षीका म्हणुन कार्यरत आहेत. सदर शिक्षिका ही औरंगाबाद शहराची

रहिवासी असून त्यांचे सासरे व सासू हे वयोवृध्द असून सासरे यांचे वय ७८ वर्षे असून त्यांना स्मरण राहत नाही. तसेच त्यांना ह्रदयरोग आहे. सासरे व सासु हे पुर्णतः त्यांच्यावर अवलंबून असल्याने त्यांना सासू सासऱ्याची त्यांची देखभाल करण्यासाठी नेहमी भिवंडी ते औरंगाबाद येथे येणे जाणे करावे लागत आहे. तसेच पती सय्यद जकीयोउद्दीन यांना सुध्दा औरंगाबाद येथेच राहावे लागत असल्याने अर्जदाराला व त्यांच्या कुटूंबाला त्याचा त्रास भोगावा लागत आहे.

तरी त्यांनी आंतरजिल्हा बदलीसाठी शिक्षणाधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांना अर्ज दिलेला आहे. तसेच प्रशासन अधिकारी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका शिक्षण विभाग भिवंडी यांचे पत्र जा.क्र.९८७ दिनांक ०७.०८.२०१८ अन्वये श्रीमती फरीदा जबीन अब्दुल गफ्फार यांनी भिवंडी महानगरपालिकेतून औरंगाबाद महानगरपालिकेत आंतरजिल्हा बदली प्रस्ताव सादर केलेला आहे व तेथून कार्यमुक्त करण्याबाबत कळविण्यात आले आहे. एकतर्फी आंतरजिल्हा बदलीसाठी अर्जदार इच्छुक असून श्रीमती फरीदा जबीन अब्दुल गफ्फार यांना औरंगाबाद महानगरपालिकेत बदली बाबत नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती नसरीन बेगम समद यार खान **अनुमोदक:-**श्रीमती सरिता अरुण बोर्डे

मा.महापौर :ना हरकत प्रमाणपत्र मिळणेच्या अटीवर हा प्रस्ताव नियमानुसार मंजूर करण्यात येते.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती फरीदा जबीन अब्दुल गफ्फार, सहाय्यक शिक्षीका भिवंडी, निजामपुर यांची आंतरजिल्हा बदली अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेत बदली बाबत नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याबरोबरच सभा संपन्न झाल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

**स्वाक्षरित/-**
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

**स्वाक्षरित/-**
महापौर
महानगरपालिका औरंगाबाद